Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

# AJANTA

Volume-VIII, Issue-II
April - June - 2019
Marathi / English Part - II / Hindi

IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

Scanned with Oken Scanner

# १७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार

प्रा. डॉ. माधव बिरादार
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, दिगंबरराव बिंदु महाविद्यालय भोकर.

## प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील एक क्रांतिपुरूष म्हणून ओळखले जातात. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्रात असाधारण कार्य त्यांनी केले आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा विचार अभ्यासकांनी विधीतज्ञ, राजकारणी, समाजकारणी, धर्मकारणी, शिक्षणतज्ञ अशा वेगवेगळ्या अंगानी केलेला पाहावयास मिळतो. परंतु बाबासाहेब आंबेडकरांची ओळख अर्थतज्ञ, जलतज्ञ, इत्यादी बाबतीत अनेकांना माहित नाही. खरे तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची मुलगामी भुमिका अर्थतज्ञाची होती. त्यांची जगविख्यात अर्थशास्त्रीय ग्रंथसंपदा व त्यांच्या सर्व सामाजिक चळवळींना असलेली आर्थिक तत्वज्ञानाची बैठक यावरून त्याचा प्रत्यय येतो. त्यांच्या आर्थिक विचारांचे योगदान आपणास त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीत केलेल्या लिखणातून मिळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक व वित्तिय विचार त्यांच्या १) Administration and finance of the East India company २) The Evolution of provincial finance in British India. ३) The problems of Rupee : Its origin and solution या तिन अर्थशास्त्रीय व वितिय विषयक ग्रंथात प्रतिबिंबीत झाले आहेत[१] यांशिवाय त्याच्या इतर लेखणातून आणि व्याख्यानातून मिश्र अर्थव्यवस्था, औद्योगिकरण व यांत्रिकीकरण, लोकसंख्या नियंत्रणाचे महत्त्व, शेती अर्थव्यवस्थेतील मजूरांची समस्या तसेच भारतीय चलनविषयक समस्या आणि उपाययोजना , भारताला असेलेली स्थिर चलनाची गरज यासारख्या बहुसंख्य विषयावर त्यांनी चर्चा केली आहे. स्वातंत्र्यानंतर ७२ वर्षापूर्वी भारताची आर्थिक स्थिती व सद्यस्थितीतील भारत यांची तुलना केली तर अर्थव्यवस्थेत अनेक परिवर्तने झालेली आहेत. हा आर्थिक विकास घडण्यामागे एक अर्थतज्ञ म्हणून डॉ. आंबेडकरांनी मांडलेले आर्थिक विचारांचे अमूल्य असे योगदान आहे प्रस्तुत शोधनिबंधपर निबंधात बाबासाहेबाच्या प्रामुख्याने शेतीविषयक विचारांचे विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्वाचा घटक आहे. म्हणूनच भारतीय अर्थव्यवस्थेला शेतीप्रधान अर्थव्यवस्था म्हटले जाते. जवळपास साठ टक्के लोकसंख्या शेतीवर आधारित आहे . अशा राष्ट्राला शेती सुधारणा करणे गरजेचे असते स्वातत्र्यंपूर्व काळापासूनच भारतात शेतीकडे दुर्लक्ष झाले आहे. त्यांच्या समस्या ह्या त्यामुळेच बिकट बनत चालल्या आहेत. आज तर अशी परिस्थिती आहे की, केवळ शेतीवर जीवन जगणाऱ्या शेतकऱ्याला अर्धपोटी राहावे लागत आहे. व आपल्या गरजा भागविण्यासाठी कर्ज काढावे लागत आहे आणि असे कर्जबाजारी शेतकरी आत्महत्या करत आहेत. हे ताजे उदाहरन आहे तरीही शेतीच्या समस्याकडे दुर्लक्षच आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जेव्हा प्रत्यक्ष राजकारणात उतरले तेव्हा भारतीय शेती अनेक समस्यांनी ग्रासली होती . असंख्य खंड, न पेलणारा शेतसारा, सावकाराचे कर्ज, अनियमित पाऊस, पुर,

पाणिटंचाई, पावसाच्या असंख्य समस्या होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जेव्हा गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्युटीव्ह कौन्सिलवर नियुक्ती झाली तेव्हा त्यांच्याकडे मजूरमंत्री व निर्माणमंत्री ही खाती देण्यात आली. त्याचा फायदा त्यांनी भारतातील शेतकऱ्यासाठी करून घेतला. या काळातच त्यांनी शेतकऱ्यासाठी काही योजना आखल्या व त्या प्रत्यक्षात आणल्या पण त्याही अगोदर अगोदर त्यांनी शेतीविषयक काही सुधारणावादी प्रयत्न केलेले दिसून येतात.

**१) जमिन धारणेसंबंधी विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९१८ मध्ये भारतातील लहान धारणक्षेत्र आणि त्यावरील उपाय (Small Holding in India and Their Remedies) हा लेख The Journal of India Economic Society या अंकात प्रसिध्द केला. त्यामध्ये त्यांनी भारताच्या शेतीविषयक प्रश्नासंबंधी तसेच त्यावरील उपायासंबंधी आपले मत मांडले आहे. या लेखात त्यांनी शेती हा एक महान राष्ट्रीय उद्योग आहे असे म्हटले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते भारताच्या एकंदर अर्थव्यवस्थेमध्ये शेतीविकास झाल्याशिवाय सुधारणा होणार नाही . भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्व जरी असले तरी भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे असे त्यांचे मत होते. त्यांच्यामते शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम करणारा महत्वाचा घटक म्हणजे शेतीच्या धारण क्षेत्राचा आकार होय. शेतजमिनीच्या आकार लहान असल्याने शेतीच्या उत्पादकतेत वाढ होत नाही.[१] डॉ. आंबेडकरांच्या मते भारतीय शेतजमीन धारणेचा प्रश्न दोन प्रकारचा असून त्यापैकी एक जमिनीच्या मालकीचा आहे तर दुसरा जमिनीच्या आकारासंबंधी आहे.

जमिनीची मालकी समाजातील वरच्या समजल्या जाणाऱ्या जातीच्या लोकाकडे मोठ्या प्रमाणात आहे तर काही प्रमाणात या जमिनी मधल्या जातीच्या लोकाकडे असुन त्यातील बहुसंख्य लोक वरच्या जातीच्या लोकाकडे कुळ म्हणुन राबतात तर खालच्या जातीच्या लोकांकडे जमिनी नसल्यामुळे ते शेतमजूर म्हणून राबत असतात. अशा पध्दतीच्या जमिनधारणापध्दतीमुळे भारतात जाती व्यवस्था व वर्णव्यवस्था अधिकच काटेकोर होण्यास मदत झाली आहे. या जमिनधारणा पध्दतीमुळे समाजातील दलीत व भुमीहीन वर्गाचे जमीनदार वर्गाकडुन मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण होत आले आहे. समाजातील बहुसंख्यांकांना, भुदास म्हणून जगावे लागत आहे. जमिन धारणेबाबत योग्य नियोजन झाले नाही तर भांडवलशाही अर्थव्यवस्थेत घडले त्याप्रमाणे मोठे शेतकरी लहान शेतकऱ्यांनां गिळंकृत करतील व येथे भांडवलशाही शेती निर्माण होईल. डॉ. आंबेडकरांना सर्वच क्षेत्रात समानता हवी होती हे त्यांच्या "२६ नोव्हेंबर १९४९ च्या घटनेचे प्रारूप संसदेमध्ये सादर करताना केलेल्या भाषणातून दिसुन येते. २६जानेवारी १९५० रोजी आपण ज्या जीवनाचा प्रारंभ करणार आहोत ते विरोधाने भरले आहे. राजकीय जीवनात समानता दिसेल"[२] परंतु आर्थिक व सामाजिक जीवनात विषमताच दिसेल त्यांना समानता हवी होती म्हणून ते म्हणतात की कसेल त्याची जमिन हे धोरण अंमलबजावणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या या विचाराचे प्रतिबिंब नंतर मांडण्यात आलेल्या "कमाल जमीन धारणा" कायद्यात आढळून आले आहे.

शेतजमीनधारण पध्दतीचा दुसरा दोष म्हणजे भारतीय शेतजमीनीचा लहान आकार हे होय. भारतातील शेतजमीनीचे तुकडे खुपच लहान आकाराचे आहेत. व ते वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेले आहेत. त्यामुळे शेती ही कमी उत्पादक राहिली आहे. बहुतांश शेती जमिनधारकांना त्या जमिनीमधून कुटुंबाची गरज भागविण्याइतपत देखील पुरेसे उत्पन्न मिळत नाही. यावर

उपाय म्हणून अनेकांनी असे सुचविले की शेतजमिनीच्या लहान तुकड्यांचे एकत्रिकरण करून आकार वाढविल्यास शेतीची उत्पादकत्ता वाढेल. परंतु डॉ. आंबेडकरांनी असे प्रतिपादन केले की केवळ शेतजमीनीचे एकत्रिकरण करणे पुरेसे नाही. तर त्यांचा आकार वाढवून त्यांना किफायतशीर करणे सुध्दा महत्वाचे आहे. भारतात जे वारासा हक्काचे कायदे आहेत तेच शेतीच्या तुकडीकरणास जबाबदार आहेत. हे कायदे तसेच राहिले तर उद्या पुन्हा तुकडे होतील म्हणून डॉ. आंबेडकरानी असे सुचविले की वारसा हक्कामुळे शेतजमिनीचा आकार बिनफायदेशीर होत असेल तर न्यायालयाने परवानगी नाकारावी व त्यादृष्टीने 'सिव्हिल प्रोसिजर कोड' मध्ये आवश्यक ते बदल करावेत.[४]

शेतजमीनीच्या तुकड्यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी अत्यंत मुलगामी दुसरा असा एक विचार मांडला की जमिनीचा एखादा तुकडा किफायतशीर आहे की बिनकिफायतशीर ही गोष्ट त्याच्या आकारावर अवलंबून नसून तेथे उत्पादनाच्या घटकाचे प्रमाण पुरेशे आहे की नाही यावर अवलंबून असते. ज्यांच्या कडे अत्यंत मोठ्या प्रमाणावर जमिनीचे क्षेत्र असते. त्यांना त्याची योग्य प्रकारे देखभाल करता येत नाही त्यामुळे देखील शेतीची उत्पादकता कमी होते. शेतजमीनीची किफायतशीरता केवळ धारण क्षेत्राशीच निगडीत असते. असे नाहीतर ती इतर अनेक घटकांशी देखील संबंधीत असते. डॉ. आंबेडकराच्या मते "किफायतशिरता धारण क्षेत्र म्हणजे जमीन, भांडवल व श्रम हे उत्पादक घटक इष्टतंम प्रमाणात उपलब्ध असणे होय.[५] म्हणून शेतीची उत्पादकत्ता वाढविण्याचा खरा उपाय शेतजमिनीच्या तुकड्याच्या आकार वाढवून स्वस्थ बसणे हा नाही तर भांडवल व इतर उत्पादनाच्या घटकाची उपलब्धता वाढविणे हा आहे. अशा तऱ्हेने किफायतशिर धारणक्षेत्र म्हणजे नुसते जमिनीचे आकारमान नसून धारणक्षेत्र आणि कार्यक्षम मशागत करण्यासाठी आवश्यक असलेली इतर साधनसामुग्री यांचा इस्टतंम मिलाप होय.[६]

## २) सामूदायिक शेतीसंबंधी विचार

शेतीसंबंधी विचार मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कुळ कायदे किंवा शेतजमिनीचे एकत्रिकरण या सारख्या उपायामुळे भूमीहीन श्रमीकांना आणि दलितांना काही विषेश फायदे होणार नाहीत यांची जाणीव होती. त्यामुळे शेतीला शासकीय व्यवसाय करण्यावर त्यांचा भर होता . त्यांच्यामते आर्थिक समता प्रस्थापित झाली तरच राजकीय स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त होईल. त्यामुळे आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी समाजाच्या आर्थिक व्यवहारात शासनाने हस्तक्षेप करणे अपरिहार्य आहे. या भूमिकेतून त्यांनी शासकीय समाजवादाचा एक भाग म्हणून सामुदायिक शेतीचे प्रतीपादन केले. डॉ. आंबेडकरांच्या मते, "लोकशाही तत्वावर आधारित सामूदायिक शेती ही अशी पध्दती आहे की जिच्यामध्ये उत्पादकता व कार्यक्षमता कायम राहून अर्थव्यवस्थेचे परिवर्तन करणे शक्य आहे तसेच सामाजिक अन्याय आणि शोषण सामुदायिक शेतीमध्ये होत नाही.[७]"

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संपूर्ण शेतजमिनीचे राष्ट्रीयकरण झाले पाहिजे यामताचे होते. जमिनीच्या मालकी हक्कामुळे ग्रामीण भागात जातीयतेचे मुळ दृढ होत आहे. शिवाय शेती विकासात व देशाच्या विकासात बाधा उत्पन्न झाली आहे . त्यांच्या मते जमिनदार व उच्चवर्णीय शेती करीत नाहीत. कारण त्यांना शेती करण्याची सवय नाही. अनुसुचीत जाती, अनुसूचित जमाती, गरीब लोक जे आपल्या घामातून सोने निर्माण करू शकतात. जमिनीचा योग्यप्रकारे उपयोग करू शकतात. त्यामुळे शेतजमिनीच्या राष्ट्रीयकरणामुळे एकीकडे उत्पादन आणि उत्पादनक्षमता वाढेल व दुसरीकडे जातीव्यवस्थेची मुळे

हालतील शेती करणाऱ्यास राष्ट्रीय उत्पादनात सहभागी झाल्याची जाणीव होईल. सामुदायिक शेती ही अन्याय व शोषण यांना थारा न देणारी पध्दती आहे. त्यामुळे त्यांनी State and Minorities या ग्रंथात म्हणतात की शेती हा राज्य उद्योग असावा. जमीनीचे मालकीत राज्याचे असावे. कोणीही जमिनदार नसावा तसेच कोणीही कुळ किंवा भुमिहीन शेतमजुर नसावा. जातीपातीचा विचार न करता निरपेक्ष बुध्दीने जमिन ग्रामस्थाना कसण्यासाठी द्यावी ही शेती सरकारच्या नियमनानूसार परंतु सामुदायिक पध्दतीने कसली जावी." ८

**साराशं**

डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे दूरदृष्टीचे धोरण त्यांच्या शेतीविषयक विचारातून सहज लक्षात येते. भारत हा शेतीप्रधान देश असून देखील इतर देशाच्या तुलनेत उत्पादकत्ता कमी आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे व वारसा हक्कामुळे शेतजमीनीचा आकार अकिफायतशीर बनत चालला आहे. या पार्श्वभुमीवर शेतीपुढील प्रश्न सोडविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी शेती विषयक मांडलेले विचार भारताच्या आजच्या परिस्थितीत महत्वपूर्ण ठरतात. त्यांनी शेतीच्या राष्ट्रीयकरण संदर्भात मांडलेले विचार खरोखरच चांगले होते. शेतीवरील भार वाढला असला तरी त्यानची उत्पादकता व उपयुक्तता मात्र वाढली असती सामुदायिक शेती व त्यांनी मांडलेल्या जलपरियोजना या दोन धोरणाचा जर भारताने स्वीकार केला असता तर आज भारत मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या शेतकऱ्याच्या आत्महत्या झाल्या नसत्या. बेकारी वाढली नसती व आज भारतात हा जगात महासत्ताक राष्ट्र म्हणून उदयास आले असते.

**संदर्भ**

1. Dr. S.G.Jadhav (Editor) Contribution of Buddhism to National Integration of India Jan. ३०,२०१८ P. १८१
2. डॉ. तुपे सु.दा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ महाराष्ट्र राज्य ग्रंथनिर्मिती मंडळ मुंबई (ऑक्टोबर-१९९९) पृ.क्र. ४००-४०१
3. डॉ. शरणकुमार लिंबाळे, पज्ञासुर्य दिलीपराज प्रकाशन पुणे . पृ.क्र. - २२९
4. डॉ. अरविंद सोनटक्के / माधव बिरादार (संपा) महानायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर साधना पब्लिकेशन परभणी पृ.क्र. -२७२
5. रायखेलकर ए. आर , आर्थिक विचारांचा इतिहास विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद (२००५) पृ.क्र - २७७
6. डॉ. तुपे सु.दा. कित्ता पृ.क्र.- ४०२-४०३
7. डॉ. भालचंद्र मुणगेकर , डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य ग्रंथनिर्मिती मंडळ मुंबई (ऑक्टोबर १९९९) पृ.क्र. ३८८-३९०
8. डॉ. पितांबरी दास , डॉ. भिमराव आंबेडकर का मानवतावाद, कला प्रकाशन वाराणशी (२००९)



Scanned with Oken Scanner